नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १५० Issue - 150 | वार - सोमवार दि. २६ ऑक्टोबर २०२६ Blow- Monday Date 26 OCTOBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# वातावरणात बदल; १३ राज्यात पाऊस पडणार

## देशातील १० राज्य आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये पावसाची शक्यता

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : बंगालच्या उपसागरात गेल्या काही तासांमध्ये सुरु असलेल्या हालचालींमुळे येत्या काही तासांमध्ये देशातील १० राज्य आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यामध्ये तामिळनाडू, केरळ, तेलंगणा, आंध्र प्रदेश, कर्नाटक, ओडिशा, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरा या राज्यांचा समावेश आहे. तर येत्या तीन दिवसांमध्ये महाराष्ट्रातील काही भागा-तही पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. गेल्या काही दिवसांपासून पूर्व-मध्य बंगालच्या उपसागरात तयार झालेले कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्यास सुरुवात झाली आहे. हे कमी दाबाचे क्षेत्र पश्चिम-वायव्य दिशेने सरकत असून त्याचे चक्रीवादळात रुपांतर होण्याची शक्यता आहे. या संभाव्य चक्रीवादळाचे नाव 'अर्णव' असे ठेवण्यात आले होते.

या सगळ्या वातावरणीय बदलांमुळे पुढील काही तासांत देशाच्या विविध भागात पाऊस पडू शकतो. तामिळनाडू आणि पद्दु-चेरीत ५० ते ६० किमी प्रतितास वेगाने वारे वाहण्याची शक्यता आहे. तर बंगालच्या खाडीतील वाऱ्याचा वेग ताशी ९० ते १०० किमीपर्यंत असण्याची शक्यता आहे. या सगळ्याचा परिणाम महाराष्ट्रावर होण्याची शक्यता आहे. दोन दिवसांपूर्वी हवामान खात्याने याविषयी भाकीत वर्तविताना सांगितले होते की, २७ ते २९ ऑक्टोबरदरम्यान महाराष्ट्रातील काही भागांत पाऊस (चरहरीरिहींीर ठरळप णि-वरींशी) पडण्याची शक्यता आहे. विशेषतः विदर्भ आणि मराठवाड्यात ढगाळ वाता-वरण निर्माण होऊन पावसाच्या सरी कोसळू



शकतात, असा अंदाज हवामान खात्याने वर्तवला होता. हवामान खात्याच्या नव्या अंदाजानुसार, महाराष्ट्रात पुढचे दोन दिवस तर कोरडे हवामान राहू शकते. २७ ऑक्टोबरला गडचिरोली जिल्ह्यासाठी पा-वसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. यावेळी वाऱ्याचा वेग हा ३० ते ४० किमी प्रतितास राहण्याची शक्यता आहे.

२८ ऑक्टोबरला महाराष्ट्रात ९ जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता आहे. यापैकी गडचिरोली जिल्ह्याला पा-वसाचा ऑरेंज अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळे गडचिरोलीत या दिवशी मुसळधार ते अतिमुसळधार पा-वसाची शक्यता आहे. तसेच कोल्हापूर घाट परिसर, हिंगोली, नांदेड, चंद्रपूर, गोंदिया, नागपूर, वर्धा, यवतमाळ या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तसेच कोकणातही पावसाच्या सरी बरसण्याची शक्यता आहे. २९ ऑक्टोबरला रत्नागिरी, नाशिक घाट परिसर, पुणे घाट परिसर, सातारा घाट परिसर, जालना, भंडारा, गडचिरोली, गोंदिया या जिल्ह्यांमध्ये पावसाची शक्यता आहे. हवामान विभागाकडून या जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

# एसटी महामंडळाला दिलासा देणारी बातमी, दिवाळी गोड होण्यासाठी कर्मचाऱ्यांना दिवाळी बोनस मिळणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : दिवाळीसाठी अवघे काही दिवसच शिल्लक राहिले आहेत. अशातच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मंडळाकडून कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड होण्याच्या अनुषंगाने पाऊल टाकली जात आहेत. एसटी कर्मचाऱ्यांचा दिवाळी सण आनंदामध्ये जाण्यासाठी परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिवाळी बोनस देण्याचा निर्णय घेतला आहे. एसटी महामंडळात सध्याच्या घडीला तब्बल ८३ हजार अधिकारी आणि कर्मचारी काम करतात. या सर्व कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड व्हावी, यासाठी नोव्हेंबर महिन्याचा वेतन दिवाळीपूर्वी देण्याचे निर्देश मंत्री प्रताप सरनाईक यांनी एसटी प्रशासनाला दिले आहेत.

एसटी महामंडळातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे वेतन दर महिन्याच्या साधारणत: ७ ते १० तारखेदरम्यान दिले जाते. यंदा दिवाळी सणाला ६ नोव्हेंबरपासून सुरूवात होत आहे. त्यामुळे दिवाळीची तारीख आणि वेतनाची तारीख लक्षात घेता एसटी महामंडळांतील कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना दिलासा देण्याचा निर्णय घेतला आहे. दिवाळी सणाच्या आधीच कर्मचार्यांना सणापूर्वीच वेतन देण्याचा निर्णय घेतला आहे. दिवाळीच्या सणासाठी कुटुंबीयांसह खरेदी, घरगुती खर्च आणि इतर नियोजन करता यावे, यासाठी कर्मचाऱ्यांच्या हातात वेळेत पगार पडणे महत्त्वाचे आहे. ही बाब लक्षात घेऊन मंत्री सरनाईक यांनी प्रशासनाला वेतनासाठी आवश्यक ती पावले उचलण्याच्या सूचना दिल्या आहेत.

दिवाळीपूर्वी वेतन देण्यासाठी एसटी महामंडळाच्या अर्थ- नियोजन विभागाने तातडीने शासनाकडे पाठपुरावा करावा. कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी आवश्यक असलेले अनुदान तसेच मागील महिन्यातील विविध प्रवासी सवलत योजनांच्या प्रतिपूर्तीपोटी शासनाकडून मिळणारी प्रलंबित रक्कम वेळेत उपलब्ध होण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, असेही निर्देश देण्यात आले आहेत. एसटी महामंडळाच्या आर्थिक अडचणींमुळे कर्मचाऱ्यांच्या सणाच्या आनंदावर विरजण पडू नये, त्या करिता प्रशासनाने या विषयाला सर्वोच्च प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला आहे. शासनाकडून आवश्यक निधी उपलब्ध होण्यासाठी महामंडळाच्या अर्थ- नियोजन विभागाने समन्वय साधून वेतन वितरणाचे नियोजन करावे आणि दिवाळीपूर्वी कर्मचाऱ्यांना पगार मिळेल, या दृष्टीने दक्षता घ्यावी, असे निर्देश सरनाईक यांनी दिले आहेत.

# राहुल गांधींचा १ नोव्हेंबर रोजी चलो दिल्लीचा नारा; रॅलीमध्ये सहभागी होण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




नवी दिल्ली : आमची मते चोरली जात आहेत आणि आम्ही हे कोणत्याही परिस्थितीत सहन करणार नाही, असा इशारा लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी देताना चलो दिल्लीचा नारा दिला आहे. राहुल गांधी यांनी सोशल मीडिया पोस्ट करताना रामलीला मैदानातील रॅलीला उपस्थित राहण्याचं आवाहन झालं आहे. राहुल यांनी सांगितले की, ज्यांनी प्रश्न विचारले त्यांच्यावर लाठीचार्ज करण्यात आला. विद्यार्थी, शेतकरी, मजूर, महिला, तरुण आणि व्यावसायिकांनी १ नोव्हेंबर रोजी दिल्लीतील रामलीला मैदानावर होणाऱ्या विरोधी पक्षाच्या सभेला उपस्थित राहावे.

हरियाणा काँग्रेसचे प्रभारी संजय दत्त आणि प्रदेशाध्यक्ष राव नरेंद्र सिंह यांनी दावा केला की, पक्षाच्या सभेला १० लाखांहून अधिक लोक उपस्थित राहतील. दरम्यान, चेंबर ऑफ ट्रेड अँड इंडस्ट्रीने (सीटीआय) शनिवारी राहुल यांना इंडिया ब्लॉक रॅली पुढे ढकलण्याचे आवाहन केले. या संघटनेने दिवाळीच्या सणासुदीच्या काळात १० हजार कोटी रुपये व्यावसायिक नुकसान होणार असल्याचा दावा केला आहे. राहुल यांनी रामलीला मैदानावरील रॅलीचे आवाहन करताना भाजप आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले, जे इतक्या उत्साहाने या कार्यक्रमाचा प्रचार करत आहेत आणि जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचत आहेत, असा टोला त्यांनी लगावला.

दरम्यान, विरोधी पक्षांनी मुख्य निवडणूक आयुक्त यांच्या विरोधात सहा सभा आणि आंदोलने केली आहेत. इंडिया ब्लॉक नेत्यांनी ६ ते १३ ऑक्टोबर दरम्यान मुख्य निवडणूक आयुक्त यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आठ आंदोलने केली. सीजेपी आणि डाव्या पक्षांनीही १० ऑक्टोबर रोजी याच मुद्द्यावर आंदोलनाची हाक दिली होती, परंतु दिल्ली पोलिसांनी परवानगी नाकारली. या काळात शहरात बॅरिकेड्स लावण्यात आले, ४५ मेट्रो स्टेशन बंद करण्यात आली आणि ७ हजारहून अधिक आंदोलकांना ताब्यात घेण्यात आले.

# 'नमो घाटा'वर राफेल-सुखोईचा थरार! १२ एअरबेसवरून १०० विमानांचे उड्डाण; काशीमध्ये ऐतिहासिक सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : उत्तर प्रदेशातील वाराणसी येथील प्रसिद्ध नमो घाटावर भारतीय वायुसेनेच्या ९४ व्या स्थापना वर्षाच्या औचित्याने 'विंग्स ओव्हर गंगा' हा अभूतपूर्व आणि भव्य एयर शो आयोजित करण्यात आला आहे. या ऐतिहासिक सोहळ्यात राफेल, सुखोई, मिराज-२०००, मिग-२९, जग्वार, अपाचे आणि चिनूक सारख्या अत्याधुनिक आणि बलाढ्य १०० विमानांनी काशीच्या आकाशात आपली ताकद दाखवून उपस्थितांचे डोळे दीपवून टाकले.

या भव्य आयोजनात सहभागी होण्यासाठी रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी वाराणसीमध्ये दाखल झाले. वाराणसीत पोहोचल्यानंतर पंतप्रधान मोदींचा भव्य रोड शो पार पडला. पोलीस लाईन्स ते चौकाघाट मार्गे नमो घाटाकडे जाणाऱ्या पीएम मोदींच्या ताफ्याचे स्वागत करण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा हजारो नागरिकांनी प्रचंड गर्दी केली होती. लोकांचा उत्साह पाहून पंतप्रधान मोदी यांनी आपली गाडी थांबवून बाहेर येत उपस्थितांना हात उंचावून अभिवादन केले.

२२ ऑक्टोबरपासून सुरू झालेल्या या भव्य आयोजनात देशभरातील १२ एअरबेसवरून आलेल्या एकूण १०० विमानांनी भाग घेतला. यामध्ये ५२ लढाऊ विमानं, १५ वाहतूक विमानं, ३२ हेलिकॉप्टर्स आणि ०१ हेरिटेज विमानाचा समावेश होता. चेन्नई आणि ग्वाल्हेरसह विविध एअरबेसवरून उडालेल्या या विमानांनी काशीच्या आकाशात चित्तथरारक कसरती सादर केल्या. सी-२९५, सी-१७ आणि सी-१३० सारख्या अजस्र वाहतूक विमानांनीही आपली ताकद दाखवून दिली.

**११,५०० जवान अन् २०० सीसीटीव्ही कॅमेरे**

हा भव्य एयर शो पाहण्यासाठी शहरात सुमारे ५० लाख नागरिकांची गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेऊन पोलीस प्रशासनाने अत्यंत कडक सुरक्षा व्यवस्था तैनात केली होती. पोलीस आयुक्त मोहित अग्रवाल यांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरक्षेच्या दृष्टीने संपूर्ण जिल्ह्याची ३० झोन आणि ५० हून अधिक सेक्टरमध्ये विभागणी करण्यात आली होती. सुरक्षेसाठी ११,५०० हून अधिक पोलीस जवान तैनात करण्यात आले असून २०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून संपूर्ण परिसरावर नजर ठेवली जात होती.

**आकाशात साकारली 'काशी'ची सांस्कृतिक ओळख**

या एयर शोचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे लढाऊ विमानांच्या कसरतींसोबतच काशीची धार्मिक आणि सांस्कृतिक ओळख आकाशात उभी करण्यात आली होती. भारतीय वायुसेनेच्या वैमानिकांनी हवेत विविध फॉर्मेशन्स तयार केले, ज्यांना महादेव, नटराज, कैलास, विश्वनाथ, त्रिदेव, वरुणा, हनुमान, ओंकार, भागीरथी, काशी आणि रुद्र अशी नावे देण्यात आली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भारतीय सेनेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नमो घाटावरून या विहंगम दृश्याचा आनंद घेतला.

**गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद ; ३१ ऑक्टोबरला ध्वजारोहणावेळीही शंखनाद**

**शंखनाद ही भारतीय परंपरेची ओळख**

# नाशिकच्या गोदातीरावर ५०१ शंखांचा आवाज घुमला; रामकुंडावर ऐतिहासिक विश्वविक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नाशिक: ज्या क्षणाची नाशिककर आतुरतेने वाट पाहत होते, अखेर तो क्षण आज आला आहे. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ध्वजारोहण सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये आज, कोजागरी पौर्णिमेच्या मुहूर्तावर रविवार (२५ ऑक्टोबर) शंखनाद करण्यात आला. ५०१ जणांच्या सामुहिक शंखनादातून नाशिकच्या रामकुंडावर गोदातिरी ऐतिहासिक विश्वविक्रम रचण्यात आला. देवमामलेदार पटांगणाजवळ हा भव्य दिव्य ऐतिहासिक कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून गोदातीरावर धार्मिक आणि सांस्कृतिक वातावरण निर्माण झालं होतं.

**५०१ शंखाच्या गजरात विश्वविक्रम**

एकाच वेळी तब्बल ५०१ जणांनी एकत्र शंखाचा निनाद केल्यामुळे विश्वविक्रम प्रस्थापित करण्याचे ध्येय समोर ठेवण्यात आले होते. अखेर हे ध्येय कोजागरी पौर्णिमेच्या सायंकाळी पूर्ण झाले आहे. यापूर्वी एकाचवेळी ३०३ जणांनी विश्वविक्रम केल्याचा विश्वविक्रम होता. आता हाच रेकॉर्ड मोडत एकाच वेळी ५०१ जणांनी शंखनाद केल्याची नोंद आयोजकांचा मानस होता. अखेर त्यांचे हे ध्येय पूर्ण झाले आहे. गिनीज वर्ल्ड रेकॉर्डच्या पथकाकडून सहभागींची उपस्थिती आणि आवश्यक निकषांची पडताळणी केल्यानंतर ५०१ शंखाचा निनाद करण्यात आला. नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण आणि गुणगौरव न्यास संचालित अनंत विजय शंखनाद पथक यांच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात आला.



शंखनादानंतर गोदातिरावर सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास गोदा आरती देखील पार पडली. भाविकांना आणि पर्यटकांना यावेळी, रामकुंडावर सामूहिक शंखनाद आणि गोदा आरतीमुळे गोदातीरावर भक्तिमय वातावरण अनुभवायला मिळाला. दरम्यान, सायंकाळी चार वाजल्यापासून कार्यक्रमस्थळी सहभागी शंखवादकांची नोंदणी, उपस्थिती तपासणी आणि पडताळणी सुरू होती. त्यानंतर गिनीज वर्ल्ड रेकॉर्डच्या निकषांनुसार विश्वविक्रमाचा प्रयत्न करण्यात आला. सायंकाळी सुमारे ०५.५० वाजेच्या सुमारास सामूहिक शंखनाद पार पडले. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या ध्वजारोहण सोहळ्याशी या उपक्रमाची सांगड घालण्यात आली आहे. ३१ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या ध्वजारोहणाच्या क्षणी याच समूहातील २५१ शंखवादकांकडून सामूहिक शंखनाद करणार आहे. त्यामुळे कुंभमेळ्याच्या मंगलारंभावेळी पारंपरिक शंखनादातून धार्मिक आणि सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडणार आहे.

**शंखनाद ही भारतीय परंपरेची ओळख**

भारतीय धार्मिक परंपरेत शुभकार्याच्या प्रारंभी शंखनाद करण्याला विशेष महत्त्व आहे. धार्मिक विधी, उत्सव आणि मंगलकार्यांमध्ये शंखनादाला पवित्रतेचे प्रतीक मानले जाते. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून प्राचीन परंपरेचा जागर करण्यासोबतच नाशिकच्या सांस्कृतिक वारशाला व्यापक व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न आहे. कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनीही या उपक्रमाचे महत्त्व अधोरेखित केले. ५०१ जणांनी एकत्रित शंखनाद करणे हा नाशिककरांसाठी विशेष क्षण होता. विश्वविक्रमाचा प्रयत्न करतानाच भारतीय सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरेचा व्यापक स्तरावर प्रसार व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ध्वजारोहणाच्या वेळीही शंखनाद होणार असल्याने या परंपरेला सिंहस्थाच्या मंगलारंभाशी जोडण्याची संधी मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## संपादकीय....

### प्रवाशांना दिलासा

एसटी महामंडळाच्या अध्यक्षांनी आणि परिवहन मंत्र्यांनी सर्वसामान्य प्रवाशांना दिलासा दिला आहे. सध्या महाराष्ट्रामध्ये दुष्काळजन्य परिस्थिती आहे. राज्यातली सध्याची दुष्काळ आणि महागाईची परिस्थिती पाहता महाराष्ट्रातील सर्व साम ान्य जनतेवर हंगामी भाडेवाढ करून आर्थिक भार टाकणे योग्य नसल्याचे मत परिवहन मंत्र्यांचे आहे. त्यामुळे महत्त्वाचा निर्णय घेत त्यांनी दिवाळी सणादरम्यान केली जाणारी, हंगामी भाडेवाढ रद्द केली आहे. परिवहन मंत्र्यांनी महाराष्ट्र राज्य म ार्ग परिवहन महामंडळ(एसटी महामंडळ)च्या अधिकृत ट्वीटर हँडलवरून हंगामी भाडेवाढ करण्याच्या निर्णयाबद्दल पोस्ट शेअर केलेली आहे. एसटी महामंडळाकडून अधिकृत पोस्ट शेअर करत, भाडेवाढीच्या प्रस्ताव नामंजूर करण्यात आल्याची माहिती सर्वसामान्य प्रवाशांना दिली आहे. शेअर केलेल्या पोस्टमध्ये लिहिले की, दुष्काळाच्या संकटात जनतेला दिलासा, भाडेवाढीला नकार, दुष्काळ आणि महागाईमुळे आधीच आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या सर्वसामान्य जनतेवर आणखी आर्थिक भार टाकणे योग्य नाही. त्यामुळे दिवाळीच्या हंगामासाठी प्रस्तावित १५% हंगामी भाडेवाढीचा प्रस्ताव नामंजूर करण्यात आला आहे. एसटी महामंडळ आर्थिक तोट्यात असले, तरी त्याचा भार सर्वसामान्य प्रवाशांवर टाकण्याऐवजी आर्थिक अडचणींवर मात करण्यासाठी पर्यायी उपाययोजना शोधण्याला आमचे प्राधान्य असेल. जनतेच्या अडचणीच्या काळात तिच्या पाठीशी उभे राहणे, हेच आमचे कर्तव्य आहे. राज्य सरकारने एसटी महामंडळाचा कायापालट करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अस्वच्छ प्रसाधन गृहे, अस्वच्छ बस डेपो आणि परिसर शिवाय, उत्तम स्थितीमध्ये असलेली लालपरी या माध्यमातून एसटी महामंडळाकडून कायापालट केला जात आहे. इतरत्र सुद्धा सुविधा नागरिकांना एसटी महामंडळाकडून दिली जात आहे. पच्या माध्यमातून सोबतच टेक्नॉलॉजीच्या माध्यमातू-नही एसटी महामंडळाचा कायापालट केला जात आहे. एसटी महामंडळाच्या बसेसमधून प्रवाशांची संख्या फार कमी झा-लेली होती. प्रवाशांचा सर्वाधिक कल खासगी ट्रॅव्हलकडे होता. प्रवाशांना सरकारकडे ओढण्यासाठी सरकारकडून नवनवीन युक्त्या शोधताना सध्याच्या घडीला दिसत आहे.

# इंडिया ज्वेलरी पार्कमुळे महाराष्ट्र जागतिक दागिने उत्पादन व निर्यातीचे केंद्र बनेल : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे (जिमाका) : मुंबई आणि महाराष्ट्राची व्यावसायिक क्षमता, कुशल मनुष्यबळ, सुरक्षित औद्योगिक वाता-वरण आणि उद्योजकतेची परंपरा यांच्या बळावर महाराष्ट्राला जागतिक स्तरा-वरील दागिने उत्पादन व निर्यातीचे प्रमुख केंद्र बनविण्याची क्षमता आहे. बदलत्या जागतिक व्यापार परिस्थितीशी जुळवून घेत आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार आणि शासन व उद्योग यांच्या समन्वयातून 'इंडिया ज्वेलरी पार्क, मुंबई' हा प्रकल्प दागिने उद्योगाच्या भविष्यातील विकासाचा महत्त्वपूर्ण केंद्रबिंदू ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज व्यक्त केला.

नवी मुंबईतील महापे येथील टीटीसी औद्योगिक क्षेत्रात 'इंडिया ज्वेलरी पार्क, मुंबई' प्रकल्पाच्या शुभारंभप्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, वनमंत्री गणेश नाईक, उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ. पी. अन्बळगन, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी दीपेंद्र कुशवाह, रत्न व आभूषण निर्यात प्रोत्साहन परिषदेचे अध्यक्ष किरीट भन्साळी, उपाध्यक्ष शौनक पारिख आदी मान्यवर उपस्थित होते.

**महाराष्ट्राच्या औद्योगिक सामर्थ्याला जागतिक संधींची जोड**

मुंबई आणि महाराष्ट्राची व्यावसायिक क्षमता, कुशल मनुष्यबळ आणि व्यावसायिकतेची जागतिक स्तरावर आ-ळख आहे. रत्न व आभूषण उद्योगासाठी आवश्यक असलेले कुशल कारागीर, उद्योजकता, व्यापाराचे अनुभवसंपन्न जाळे आणि अनुकूल औद्योगिक वाता-वरण ही महाराष्ट्राची बलस्थाने आहेत. या सामर्थ्याचा उपयोग करून राज्याला जागतिक दागिने उद्योगातील महत्त्वाचे केंद्र बनविण्याची संधी इंडिया ज्वेलरी पार्कच्या माध्यमातून उपलब्ध झाली आहे, असे




मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

बदलत्या जागतिक व्यापाराशी जुळवून घेण्याचे आवाहन

जागतिक स्तरावरील बदलती परिस्थिती आणि अमेरिका व चीनसारख्या मोठ्या बाजारपेठांमधील घडामोडींमुळे आंतरराष्ट्रीय व्यापारासमोर नवी आव्हाने निर्माण होत आहेत. अशा परिस्थितीत उद्योगांनी बदलत्या बाजारपेठांचा अभ्यास करून आधुनिक तंत्रज्ञान, उत्पादना-तील नावीन्य आणि निर्यातीच्या नव्या संधींचा स्वीकार करणे आवश्यक आहे. इंडिया ज्वेलरी पार्क या बदलांना सामोरे जाण्यासाठी दागिने उद्योगाला आधुनिक व्यासपीठ उपलब्ध करून देईल, असा विश्वास मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी व्यक्त केला.

**इंडिया ज्वेलरी पार्क उद्योगाच्या भविष्याचा महत्त्वपूर्ण टप्पा**

महापे येथील २२ एकर क्षेत्रावर अत्याधुनिक दागिने उत्पादन केंद्र विकसित करण्यात येत आहे. हा प्रकल्प उद्योगाच्या दीर्घकालीन विकासासाठी महत्त्वाचा टप्पा ठरेल. आजपासून ३० ते ४० वर्षांनंतर मागे वळून पाहताना इंडिया ज्वेलरी पार्कच्या उभारणीसाठी प्रयत्न करणाऱ्या उद्योग क्षेत्रातील नेतृत्वाचे निश्चितपणे स्मरण केले जाईल, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी नमूद केले.

उद्योग उभारणीसाठी केवळ जमीन उपलब्ध करून देणे पुरेसे नसून, वीज, पाणी, रस्ते, भांडवल, पायाभूत सुविधा आणि विविध विभागांच्या परवानग्या वेळेत मिळणे आवश्यक आहे. इंडिया ज्वेलरी पार्कच्या कामात कोणत्याही अडचणी आल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी तत्परतेने मदत करावी. प्रकल्पाचे काम वेगाने पूर्ण करण्यासाठी शासनाकडून आवश्यक ते सर्व सहकार्य दिले जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिली.

उद्योग क्षेत्राच्या विकासासाठी शासन आणि उद्योग यांच्यातील समन्वय व भागीदारी महत्त्वाची आहे. उद्योगांच्या गरजा समजून घेऊन आवश्यक सुविधा आणि प्रशासकीय सहकार्य उपलब्ध करून देण्याची शासनाची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**विकसित भारताच्या संकल्पपूर्तीत महाराष्ट्राचे योगदान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०४७ पर्यंत विकसित भारत घडविण्याचा संकल्प केला आहे. या उद्दिष्टाच्या पूर्ततेसाठी उत्पादन, निर्यात, रोजगारनिर्मिती आणि उद्योजकता यांची भूमिका महत्त्व-पूर्ण असेल. भारत पाच ट्रिलियन अमेरिकी डॉलर अर्थव्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करत असताना महाराष्ट्रही एक ट्रिलियन अमेरिकी डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रयत्नशील आहे. इंडिया ज्वेलरी पार्कसारखे प्रकल्प या आर्थिक वाटचालीला बळ देतील, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.

ज्वेलरी उद्योगात २५ हजार कोटींची गुंतवणूक, एक लाख रोजगारांच्या संधी निर्माण होणार : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

इंडिया ज्वेलरी पार्क प्रकल्पाम ुळे सुमारे २५ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित असून, प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष स्वरूपात एक लाख रोजगारांच्या संधी निर्माण होतील. महापे येथील २२ एकर क्षेत्रावर उभारण्यात येणारे हे अत्याधुनिक दागिने उत्पादन केंद्र महाराष्ट्राला जागतिक स्तरावरील रत्न व आभूषण उत्पादन, व्यापार आणि निर्यातीचे प्रमुख केंद्र बनविण्यास महत्त्व-पूर्ण ठरेल, असा विश्वास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

मुंबईच्या झवेरी बाजाराला रत्न व आभूषण व्यापाराचा समृद्ध इतिहास असून, बीकेसी येथील भारत डायमंड बोर्स आणि सीप्झसारख्या केंद्रांनी मुंबईला जागतिक हिरे व्यापार आणि दागिने निर्यातीच्या क्षेत्रात महत्त्वाचे स्थान मिळवून दिले आहे. देशाच्या एकूण रत्न व आभूषण निर्यातीपैकी ५० टक्क्यांहून अधिक निर्यात महाराष्ट्रातून, विशेषतः मुंबईतून होते. या उद्योगाला चालना देण्यासाठी राज्य शासनाने जेम्स अँड ज्वेलरी धोरणाच्या माध्यमातून एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित करणे, पाच लाख रोजगार निर्माण करणे आणि राज्यातील रत्न व आभूषण निर्यात दुप्पट करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

इंडिया ज्वेलरी पार्कमध्ये दोन हजारांहून अधिक उत्पादन युनिट्स सामावून घेण्याची क्षमता निर्माण करण्याचे उद्दिष्ट आहे. उद्योगाच्या उभारणीसाठी आवश्यक वीज, पाणी, रस्ते, पायाभूत सुविधा आणि विविध विभागांच्या परवानग्या वेळेत मि ळणे महत्त्वाचे आहे. या प्रकल्पासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून, कामगारांच्या निवासाची व्यवस्थाही विचारात घेण्यात आली आहे. प्रकल्पाच्या अंमलबजावणीत कोणतीही अडचण आल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी तत्परतेने मदत करावी आणि प्रकल्पाचे काम वेगाने पूर्ण करण्यासाठी शासना-चे संपूर्ण सहकार्य राहील, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी दिली.

**इंडिया ज्वेलरी पार्कमुळे नवी मुंबईचे जागतिक स्तरावरील महत्त्व वाढणार : वनमंत्री गणेश नाईक**

औद्योगिकीकरणातून निर्माण होणाऱ्या संधींचा लाभ सर्वसामान्य जनतेला मि ळावा, या दृष्टीने शासनाच्या विविध यंत्रणा योग्य दिशेने काम करीत आहेत, ही समाधानाची बाब आहे. भविष्यात नवी मुंबईची ओळख डेटा सेंटर हब म्हणून निर्माण होण्याबरोबरच इंडिया ज्वेलरी पार्कमुळे जागतिक स्तरावर या शहराचे महत्त्व अधिक वाढणार आहे. राज्यासमोर नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ आणि वाढत्या उष्णतेच्या लाटेसारखी आव्हाने असतानाही शेतकरी, कामगार, विद्यार्थी आणि नागरिकांना शाश्वत जीवन जगण्यासाठी आवश्यक संधी उपलब्ध करून देण्याचा शासन प्रामाणिकपणे प्रयत्न करत असल्याचे वनमंत्री नाईक यांनी सांगितले.

रत्न व आभूषण निर्यात प्रोत्स-ाहन परिषदेचे अध्यक्ष किरीट भन्साळी यांनी प्रास्ताविक केले. त्यांनी प्रकल्पाची पार्श्वभूमी आणि रत्न व आभूषण उद्योगाच्या विकासातील त्याचे महत्त्व विशद केले.

## कुटूंब व्यवस्थेची जपवणूक करण्यासाठी कौटुंबिक न्यायालयाची गरज : कवी राजेंद्र सोमवंशी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

भारतीय संस्कृती ही जगा-तील सर्वमान्य श्रेष्ठ अशी संस्कृती मानली जाते. कुटूंब व्यवस्था ही सांस्कृतिक वारसा मानली जाते.कुटुंब व्यवस्था हा अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जा-तो, त्यामुळे भारतात आजही बहुसंख्य सदस्य असलेले कुटुंब बघायला मिळतात. सामाजिक परिस्थितीतील परिवर्तन, अतिम हत्वाकांक्षा, अनावश्यक गोष्टींचे पाश्चात्य अंधानुकरण व संवादाचा अभाव यामुळे आजच्या काळात कुटुंबातील विसंवाद व अंतर वाढताना दिसत आहे.

त्यामुळे कुटूंबात संवाद साधला जावा व कुटुंबव्यवस्था सुदृढ व सुरक्षित राहण्यासाठी कौटुंबिक न्यायालयाची गरज असल्याची भावना प्रमुख अतिथी व कवी राजेंद्र सोमवंशी यांनी व्यक्त केली.

२३ ऑक्टोंबर २०२६ रोजी कौटुंबिक न्यायालय, नाशिक च्या १७ व्या वर्धापनदिनानिमित्त कौटुंबिक न्यायालयाची गरज या विषयावर प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. न्यायाधीश.पेटकर व न्यायाधीश पालसिंगकर यांनी मनोगत व्यक्त केले.

व्यासपीठावर समुपद-ेशक श्री.शिंदे पाटणकर वकील संघाच्या अध्यक्षा अँड. वर्षा देशमुख, उपाध्यक्ष शिरीष पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन अँड. बाळकृष्ण मोरे यांनी केले तर आभार अँड.शिरीष पाटील यांनी मानले.

## शेळवेतील १० वाळूतस्कारांवर हद्दपारची कारवाई

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर - पंढरपूर शहर व तालुक्यातून भीमा नदी पात्र कोरडे पडले असून नदी काठावरील अवैद्य वाळू उपसा रात्रंदिवस सुरू असून याची प्रशासनाने दखल घेतली असून पंढरपूर तालुक्यातील शेळवे येथे वाळू उपसा आणि वाळू तस्करांच्या व्यवसायात सक्रिय असलेल्या दहा जनावर हद्दपारची कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईमुळे अवैध वळू उपसा करणारा चे धाबे दणाणले आहेत. असून वाळू तस्कराविरुद्ध पोलीस प्रशासनाने कटोरी भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे

भीमा नदीपत्रातील पाण्याची पातळी घटल्याने अनेक ठिकाणी नदीपात्र उघडे पडले आहे. याचा फायदा घेत काही ठिकाणी वाळ-ूचा अवैध उपसा सुरू असल्याचे तक्रारी समोर येत होत्या नदीप-ात्रातून वाळू काढून तिची विक्री करण्याची प्रकार सुरक्षेचे व पर्यावरणाची हानी होत आहे त्याचबरोबर शासनाचे महसुलाचे नुकसान होत आहे या पार्श्वभूम ीवर अवैध वाळू उपसा करणाऱ्या वर कठोर कारवाई करण्याची करण्याची मागणी होत आहे.

पंढरपूर शहर व तालुक्यातील भीमा नदी काठावरील अवधू उपसा सुरू असल्याचे प्रकाराकडे नदीपात्र कोरडे असलेली वाळू तस्करांना मोकळे रान मिळाल्याचे चित्र समोर आले होते. याची दखल घेत पोलीस प्रशासनाने अवैद्य वाळू उपसा करणाऱ्या त्या सहभाग असलेल्या व्यक्ती विरोधात प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचा बडगा उघडला आहे. पंढरपूर तालुक्यातील शेळवे येथील वाळू तस्करांच्या प्रकरणात येतील दहा जणाविरुद्ध संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातून एक वर्षासाठी हद्दपार करण्याची आदेश देण्यात आले आहेत त्यामुळे अवैध उपसा करणाऱ्या विरुद्ध तस्करा बाळा घालण्यासाठी पोलिसांनी निर्णय फोन उचलण्याची मानले जात आहे वाळू तस्करांची संबंधित गुन्ह्यात गंभीरित्या लक्षात घेऊन पोलिसांनी हद्दपारचे प्रस्ताव तयार केला होता. संबंधितांना नोटीस देऊन त्यांची बाजू ऐकण्यात ऐकून घेण्यात आली. त्यानंतर कायदेशीर कारवाई करून खाद्य परीची कारवाई करण्यात आली.

शेळवे येथील १० जणांवर कारवाई नंतर आता तालुक्यातील आता अवैद्य वाळू उपसा करणाऱ्या तस्करांची धावे दण-ाणले आहे वाळू उपसा आणि वाहतूक व विक्रीच्या माध्यमातून नवोदय व्यवसाय करणाऱ्या विरुद्ध माहिती संकलित करून त्यांच्यावर ही कारवाई पुढील काळात करण्यात केली जाईल असे शक्यता आहे.

# ॲड.भिमाबाई निंगाप्पा गायकवाड यांच्या ऑफिस व दिक्षिता ऑनलाईन अँड टायपिंग सेंटर चे उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ॲड.भिमाबाई निंगाप्पा गायकवाड यांच्या ऑफिस व दिक्षिता ऑनलाईन अँड टायपिंग सेंटर चे उद्घाटन मा. ॲड. मिलिंदजी थोबडे (ज्येष्ठ विधीज्ञ) शुभहस्ते फीत कापून उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी आलेल्या प्रमुख मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. ॲड.मिलिंद थोबडे मनोगत व्यक्त करताना म्हणाले ॲड. भीमाबाई उच्च सुशिक्षित असून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चे विचार डोळ्यासम ोर ठेवून गोरगरीब अन्यायग्रस्त समाजाला पैशाची अपेक्षा न बाळगता न्याय देण्याचे आव्हान केले.




वकील व्यवसाय हा संघर्षाचा असून भविष्यात यशस्वी वकील बनण्यासाठी कठोर परिश्रम, एकाग्रता व प्रामाणिकपणा जोपासण्याचे मूलमंत्र दिले त्याचबरोबर आपले भावना व्यक्त करताना (ज्येष्ठ साहित्यिका, मा. नसीमा पठाण मॅडम यांनी यशस्वी विद्यार्थिनी ड.भीमाबाई गायकवाड यांच्याबाबतीत बोलताना म्हणाले की, माझी नुकताच डोळे ऑपरेशन झाले असताना माझ्या नवे दृष्टीने माझ्या ड.भीमाबाईला यशस्वी होताना माझं मन भरून आलं इएव चे माझी विद्यार्थिनी असून ती फक्त L.L.B. न करता याही अगोदर ३विषयात च. तसेच च.एव देखील केलेली आहे मी शिकवलेल्या शिक्षण महाविद्यालयात प्राध्यापकाची ही सेवा केलेली आहे. मला गर्व आहे माझ्या विद्यार्थिनीचा प्रत्येकाच्या संकटात हाकेला होकार देऊन धावून लोकांचे प्रश्न सोडवते ती लोकांचे गरिबीत काम केलं, संकटात काम केलं, त्यामुळे तिच्या गरिबीच्या झाडाला प्रामाणिक पणाचे यशस्वी फळ मिळालं.आजपर्यंत कोणताच धनदौलत कमाव-लेली नसताना हृदयापासून धावून येणारे माणस कमवले. अशा शब्दात वर्णन केले. तसेच अखिल भारतीय भटक्या विमुक्त समाजाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. मच्छिंद्र जी भोसले साहेब यांनी आपले भावना मांडताना म्हणाले की, ड. भीमाबाई ही भिमाची लेक असून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विच-ारावर चालत कायद्यांचा शिक्षण घेऊन ताठ मानेन आणि स्वाभिम ानान सोलापूरकरांच्या आणि तडवळकरच्या अभिमानास्पद आहे मी गेल्या १२ वर्षापासून तिला पाहतो घरची नाजूक परिस्थिती असताना प्रत्येक संकटाला खंबीरपणे तुडवत ती अभिमानाने एक धगधगता ज्वाला होऊन अन्यायग्रस्त लोकांना न्याय देताना अगदी जवळून पहिलोय. ती एक वकीलच नसून दलित पँथर सोलापूर महिला जिल्हा अध्यक्षा आहेत. तसेच अखिल भारतीय भटके विमुक्त जाती अंतर्गत न्याय हक्कासाठी अनेक भटक्या विमुक्त जाती जमातीसाठी आंदोलने करून शासनाला जाग करण्याचे काम तिने केलेली आहे. आमच्या संघटनेमध्ये काम करताना खिशात पैसेचे पाठबळ नसताना देखील वेळेला महत्व देत प्रत्येक अडीअडचणीच्या सुखदुःखात सहभागी होती. कोणत्याही सामाजिक, राजकीय कार्यात वेळेत येण्यासाठी धडपडत असताना जून असलेली साधी गाडी सुद्धा वेळेत साथ देत नाही कित्येकवेळा गाडी पेट्रोल नसल्याने कधीही कुठेही बंद पडते मात्र भिमाबाईचा उत्साह मात्र कधीही बंद पडलेला दिसला नाही. हेच तिचा इच्छाशक्ती तिला मोठं केल्याशिवाय रा-हणार नाही. मीही तिच्या सुखदुःखात तिच्या पाठीशी एक भाऊ म्हणून खंबीरपणे उभा असून सोलापूरकरांनी आणि तडवळकरांनी जसं नर रत्नाला जन्म दिला तसा ही एक नररत्न अखेर न्यायाधीश होतील अशी अपेक्षा बाळगतो अशा शब्दात भावना व्यक्त केल्या. तसेच मा. सुनील बापू खटके सो.म.पा आरोग्य सभापती व इतर म ान्यवर मनोगत व्यक्त केले. तसेच प्रा. बसवंत गायकवाड यांनीही बोलताना म्हणा-ले की, आमच्या कुटुंबामध्ये आईवडिलांच्या आशीर्वादाने आपल्यासारख्या थोर व्यक्तीच्या सहकार्यामुळे माझी भगिनी थोर विचारवंत डॉ. बाबासाहेबांचे विचार डोळ्यासमोर ठेऊन ती स्वतः शिक्षणातच.MEd, आता L.L.B करून शैक्षणिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात सर्वत्र आपली ठसा उमटवत आली . तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर व विद्रोही कवी पद्मश्री मा.नामदेव ढसाळ यांच्या विचाराच्या जोरावर अनुसूचित व भटके जाती व जमातीच्या न्याय हक्कासाठी आंदोलनाच्या माध्यमातून रोडवरची लढाई लढवून सरकारला जाग केली व न्याय दिली तसेच वंचित लोकांना न्याय मिळवून देण-ारी माझी भगिनी आता कायद्याच्या माध्यमातून लढाई लढण्यासाठी अधिकृत वकील पदवी बहाल केली असून सर्वांना कायद्याच्या माध्यमातून न्याय देतील अशी अपेक्षा आहे मला तिचा सार्थ अभिमान आहे. तिच्या अंगी सर्वांगीण गुण असल्याने तिच्या कला कौशल्याच्या जोरावर तिला सोलापूर दलित पँथर जिल्हा म हिला अध्यक्षा , प्राध्यापिका , आता वकिलाचाही भार तिच्या खांद्यावर पडल्याने ती चोखप-णे कार्य करतील अशी आशा बाळगतो अशा शब्दात भावना व्यक्त केले. कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी ड. मिलिंद-जी थोबडे (महाराष्ट्र व गोवा बार असोसिएशन सदस्य)ड . भारत कट्टे, (ज्येष्ठ विधीज्ञ) मा. नसीमा पठाण( ज्येष्ठ साहित्यिका तथा संभाजी बीएड कॉलेजच्या प्राचार्या), मा. मच्छिंद्र भोसले (अ,भा.भटके वी.रा.अध्यक्ष), मा. सुनील बापू खटके (सो.म.पा. आरोग्य सभापती), मा. संजीव पाटील (मा. सभापती अक्कलकोट) ॲड.शिवकैलास झुरळे (ज्येष्ठ विधीज्ञ), ॲड. उमेश मराठे (ज्येष्ठ विधीज्ञ), ड.परमानंद जवळकोटे (उपाध्यक्ष सोल-ापूर बार असोसिएशन) ड. जयप्रकाश भंडारे (सचिव बार असोसिएशन सोलापूर) ड. शताब्दीकुमार दोडयानुर,(डॉ. बा.अ. वि. मं. सो)

ड. चंद्रसेन गायकवाड (खजिनदार बार असोसिएशन सोलापूर) मा.विलास गव्हाणे (सभापती अक्कलकोट) प्रा.बसवंत गायकवाड (प्राध्यापक श्री एस एस शेळके महाविद्यालय वागदरी)ड. वैशाली बोराडे, ड . शितल गोसावी मा. ऋतूपूर्णताई फुलारी (क्लर्क) ड. शुभम माने, ड, प्रकाश सोनार, ड. अर्चना विधाते, ड. तुषार ताकभाते ड. मनीषा शिंदे, ड. निलेश सोनवणे ड.चिदानंद सुटे ड. मयूर बनसोडे ड.भगवान बांगर ड.एजाज शेख.प्रा.कलशेट्टी सर मा. यशवंत फडतरे मा.कीर्तीपाल शिवशरण मा.पंडित अरवत (सावकार)मा.लालकोट (भैय्या ) समाजसेवक मा.सिद्धाराम घटकांबळे मा.लक्ष्मण भोसले आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी पार पडण्यासाठी सूत्रसंचलन व आभारप्रदर्शन जनता संघर्ष चे संपादक. मा.सिद्धार्थ भडकुंबे यांनी केले तर मा.लालकोट भय्या यांनी परिश्रम घेतले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# 'उंच ध्येय ठेवा, अपयशातून शिका व स्वतःच्या संधी स्वतः निर्माण करा' : पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर

## एमआयटी विश्वप्रयाग युनिव्हर्सिटीचा पहिला दीक्षांत समारंभ उत्साहात संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : विद्यार्थ्यांनी आपल्या स्वप्नांना भौगोलिक किंवा परिस्थितीजन्य मर्यादांचे बंधन घालू नये. तुमचा जन्म कुठे झाला, यावर तुमचे अंतिम ध्येय ठरत नाही. स्वप्ने मोठी ठेवा, ती साकार करण्यासाठी कठोर परिश्रम, चिकाटी व ध्येयाप्रती निष्ठा ठेवावी. आयुष्यभर शिकत राहा आणि स्वतःसाठीच नव्हे, तर इतरांसाठीही संधी निर्माण करा. असे विचार ज्येष्ठ शास्त्रज्ञ, पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी मांडले. केगाव, सोलापूर येथील एमआयटी विश्वप्रयाग युनिव्हर्सिटीच्या पहिल्या दीक्षांत समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माईर्स एमआयटी शिक्षण समूहाचे संस्थापक अध्यक्ष व कुलपती प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड होते, तर बालाजी अमाइन्सचे व्यवस्थापकीय संचालक राम रेड्डी सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते.

या समारंभात बीसीए, एमबीए आणि एमसीए या अभ्यासक्रमांतील एकूण ९० विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली, तर शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सात गुणवंत विद्यार्थ्यांना गुणवत्ता प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी एमआयटी विश्वप्रयाग युनिव्हर्सिटीच्या कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड चाटे, कुलगुरू प्रा. गोपाळकृष्ण जोशी, प्र-कुलगुरू डॉ. विद्या निरंजन, बेंगळुरू येथील बायोवेट प्रा. लि. चे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. एन. एस. श्रीनाथ, जेआयटीच्या सेंटर फॉर इनक्युबेशन, इनोव्हेशन, रिसर्च अँड कन्सल्टन्सी' (उखखठउ) चे संचालक डॉ. कृष्णा व्यंकटेश, कुलसचिव प्रा. प्राणेश मुरनाळ, परीक्षा नियंत्रक प्रा. प्रभा कासलीवाल, संचालक राघवेंद्र मुकुंदराज चाटे आणि विविध शाखांचे अधिष्ठाता यांच्या उपस्थितीत हा समारंभ पार पडला.

पुढे बोलताना डॉ. माशेलकर म्हणाले शिक्षणाकडे केवळ पदवी मिळविण्याचे साधन म्हणून न पाहता, भविष्य घडविण्याची आणि समाजात सकारात्मक परिवर्तन घडविण्याची संधी म्हणून पाहावे. उत्कृष्टतेचा ध्यास घेऊन कमी साधनांतून अधिकाधिक लोकांसाठी मूल्य निर्माण करावे. तंत्रज्ञानासोबत विवेकबुद्धी, सहानुभूती व प्रामाणिकपणाची जोपासना करावी, असा संदेश त्यांनी पदवीधर विद्यार्थ्यांना दिला. आपल्या अध्यक्षीय भाषणात प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी शिक्षणाचे अंतिम उद्दिष्ट ज्ञान, चारित्र्य आणि मानवतेची सेवा आहे. संत ज्ञानेश्वरांच्या वैश्विक तत्त्वज्ञानाचा वारसा घेऊन विद्यार्थ्यांनी विश्वाच्या कल्याणासाठी कार्य करावे आणि समाजाप्रती आपले उत्तरदायित्व निष्ठेने पार पाडावे, असे आवाहन केले.

समारंभाचे सन्माननीय अतिथी राम रेड्डी यांनी उद्योगक्षेत्रातील बदलत्या गरजांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांनी ज्ञानासोबत प्रॅक्टिकल नॉलेज, प्रभावी संभाषण आणि बहु-कौशल्ये आत्मसात करणे काळाची गरज बनली आहे. कार्यक्षेत्रातील सकारात्मक दृष्टिकोनच विद्यार्थ्यांना भविष्यात यशस्वी बनवतो. असे प्रतिपादन केले. कार्यकारी अध्यक्षा प्रा. स्वाती कराड-चाटे पदवीधरांचे अभिनंदन करताना म्हणाल्या दृढ निश्चय, समर्पण आणि प्रामाणिकपणाच्या बळावर जीवनातील कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीवर मात करता येते. एआयच्या युगात 'शिका, जुने विसरा आणि पुन्हा नव्याने शिका' ही वृत्ती अंगीकारल्यास कोणतेही तंत्रज्ञान मानवाला कालबाह्य ठरवू शकत नाही. मात्र, यशाच्या शिखरावर पोहोचताना विद्यार्थ्यांनी आपल्या मुळांशी असलेली नाळ कधीही तोडू नये. विज्ञानासोबत निसर्गाचे रक्षण आणि सर्व सजीवांचे सहअस्तित्व जपणे, हीच खरी शाश्वत प्रगती आहे.

प्रा. गोपाळकृष्ण जोशी म्हणाले एमआयटी विश्वप्रयाग युनिव्हर्सिटी दर्जेदार शिक्षण, नवोन्मेष आणि स्टार्ट अप्सच्या बळावर सोलापूरच्या सामाजिक-आर्थिक विकासाला नवी गती देत आहे. पर्यावरणपूरक संकुल, मियावाकी जंगल आणि जलसंधारणाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत, स्थानिक गरजांना जागतिक दर्जाच्या शिक्षणाची जोड देऊन सोलापूरला उत्कृष्ट ज्ञानकेंद्र बनवण्यासाठी विद्यापीठ कटिबद्ध असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. समारंभाच्या सुरुवातीला प्रा. प्रभा कासलीवाल यांनी मान्यवरांचे स्वागत केले, प्रा. रूपाली धामणे यांनी सूत्रसंचालन केले आणि कुलसचिव प्रा. प्राणेश मुरनाळ यांनी आभार मानले.

## माजी केंद्रीय गृहमंत्री सुशील कुमार शिंदे यांच्या जीवन चरित्र लोभस पुस्तकाचे राजीव खांडेकर यांच्या हस्ते प्रकाशन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर - भगवान इंगळे लिखित लोभसपुस्तकातून सुशील कुमार शिंदे यांच्या राजकीय आणि सामाजिक कार्याचा प्रवास उलगडणार.

लोभस या पुस्तकाचे प्रकाशन एबीपी माझा चे मुख्य संपादक राजीव खांडेकर यांच्या हस्ते डॉक्टर निर्मल कुमार फडकुले सभागृह सोलापूर येथे उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाले.

एक प्रकाशन सोहळ्यात माजी केंद्रीय गृहमंत्री सुशील कुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे, लेखक भगवान इंगळे, ग्रंथालीची सुदेश हिंगलालपूरकर धनश्री धारब विश्वनाथ साठे सोलापूर शहर काँग्रेसचे अध्यक्ष चेतन भाऊ नरोटे सातलिंग षटकार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर मित्रपरिवार आणि पुस्तक प्रेमी उपस्थित होते.

महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी शासन कीर्ती जागत व्हा असा क्रांतिकारी संदेश दिला व दलिता सह तळागाळातील सामान्य जनतेचा उद्धार व्हायचा असेल तर सत्तेत सहभागी होणे आवश्यक आहे हा विचार सुशील कुमार शिंदे यांच्या राजकीय प्रवासासाठी प्रेरणादायी ठरला याच विचारातून त्यांनी सीआयडी खात्यातील नोकरी सोडून राजकारणात प्रवेश केला.

स्वतःही लोक कल्याणीची साधन आणि जनकल्याण हेच अंतिम साध्य अशी भूमिका सुशीलकुमार शिंदे यांनी आपल्या राजकीय वाटचालीत जपली. आपल्या कार्यातून त्यांनी असंख्य लोकांशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण केले विरोधकांची देखील आपुलकीने आणि सौजन्याने वागण्याची त्यांनी त्यांची शैली व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणून या पुस्तकात अधोरेखित करण्यात आले आहे.

सुशील कुमार शिंदे यांच्या राजकीय सामाजिक आणि वैयक्तिक जीवनातील विविध पैलूंवर प्रकाश टाकणारे हे चरित्र वाचकांच्या त्यांच्या प्रदीर्घ वाटचालीची ओळख करून देणारे आहे. भगवान इंगळे यांनी शब्दबद्ध केलेल्या या जीवन चारित्र्याच्या प्रकाशनामुळे त्यांच्या जीवन प्रवासातील आठवणी, विचार आणि कार्याचा लेखाजोखा वाचकांसमोर आला आहे.

## कोजागिरी पोर्णिमा श्री रुक्मिणी मातेला पारंपरिक अलंकारांचा साज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : घटस्थापनेपासून सुरू झालेल्या नवरात्र महोत्सवानिमित्त श्री क्षेत्र पंढरपूर येथील श्री रुक्मिणी मातेला पारंपरिक पोषाखासह विविध अलंकार परिधान करण्यात आले आहेत. दरवर्षीच्या प्रथा-परंपरेनुसार मातेचा साजशृंगार करण्यात आला असून, अलंकारांनी सजलेले श्री. विठ्ठलाचे व माता रुक्मिणीचे रूप भाविकांचे लक्ष वेधून घेत असल्याचेमाहिती श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीचे व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.





श्री विठ्ठलास सोन्याची पगडी, कौस्तुभ मणी, दंडपेट्य जोड, हिऱ्याचे कंगनजोड, मोत्याचा तुरा, मोत्याची कंठी एक पदरी, मोत्याची कंठी दोन पदरी, मारवाडी पेठयांच्या मोत्याचा हार, बाजीराव कंठी, शिरपेस लहान, तोडे जोड, तुळशीची माळ, मस्त्य जोड, सोन्याचे पितांबर इ. अलंकार परिधान करण्यात आलेली आहेत.

रुक्मिणी मातेस सोन्याचे मुकुट, खाड्यांची वेणी, चिंचपेटी हिरवी, ठूशी, सोन्यामोत्याचे ताणवाड जोड, चंद्र, सूर्य, मोत्याचा कंठा, बाजीराव गरसोळी, मन्यामोत्याच्या पाटल्या जोड, मोत्याचे मंगळसूत्र, सोन्याचे बाजूबंद जोड, मत्स्य जोड, पैंजण जोड, मोठी नथ, कर्णफुले जोड, लक्ष्मीहार, पुतळ्यांची माळ, तारा मंडळ इत्यादि अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

महालक्ष्मी मातेला सोन्याचे गंठण, तोरडी जोड, इमिटेशन नेकलेस, एकदानी, अष्टपैलू मण्याची कंठी, चंद्रहार, जवेची माळ, चांदीची छत्री इत्याधी अलंकार परिधान करण्यात आलेले आहेत.

श्री. व्यंकटेशास तांदळया हार, पदकासह लॉकेट, तुळशीची माळ, मोहरांची माळ, मोठी बोरमाळ, कोयरीहार इत्यादी अलंकार प्रथा परंपरेप्रमाणे परिधान करण्यात आलेले आहेत.

तसेच मंदिर समितीच्या अख्त्यातरीत असलेल्या पंढरपूर शहर व परिसरातील लखुबाई, अंबाबाई, पद्मावती, यल्लमादेवी, यमाई-तुकाई माता आदी परिवार देवतांना देखील पारंपारिक पोषाख करण्यात असल्याची माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी दिली.

**कागदपत्रांचा व्याप कमी होणार आणि लाभांचे वितरण अधिक पारदर्शक होणार** | **सहकारी संघ पद्धतीचे सशक्त उदाहरण**

# डिजिटल शेतीच्या क्षेत्रात मोठे यश; ११ कोटी फार्मर आयडी अर्थात शेतकरी ओळखपत्रे निर्धारित वेळेच्या पाच महिने आधीच तयार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

डिजिटल शेतीच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण टप्पा गाठत, भारत सरकारने ११ कोटी फार्मर आयडी तयार करण्याचे आपले उद्दिष्ट ३१ मार्च २०२७ या अंतिम मुदतीच्या पाच महिने आधीच पूर्ण केले आहे. केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण तसेच ग्रामीण विकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी या यशा संदर्भात सांगितले की पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विकसित भारत आणि समृद्ध शेतकरी हे स्वप्न साकार करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाद्वारे राबवल्या जाणाऱ्या डिजिटल ग्रिकल्चर मिशन अंतर्गत हे उद्दिष्ट साध्य करण्यात आले आहे. फार्मर आयडी उपक्रमाचा उद्देश शेतकऱ्यांना एक अद्वितीय डिजिटल ओळख प्रदान करणे हा आहे. यामुळे सरकारी योजना, बँक कर्ज, पीक विमा आणि नैसर्गिक आपत्तीच्या वेळी मिळणारी मदत, या सर्व सुविधा पारदर्शक, कार्यक्षम आणि वेळेवर मिळणे शक्य होईल. तसेच, कागदपत्रांचे काम कमी होईल आणि वारंवार पडताळणी करण्याची गरजही उरणार नाही.



**निर्धारित वेळेच्या पाच महिने आधीच उद्दिष्ट पूर्ण**

केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी सांगितले की २३ ऑक्टोबरच्या रात्रीपर्यंत ११ कोटी फार्मर आयडी तयार करण्याचे काम यशस्वीपणे पूर्ण झाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हे उद्दिष्ट गाठण्यासाठी ३१ मार्च २०२७ ही अंतिम मुदत दिली होती. कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय, राज्य सरकारे आणि क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी यांनी समन्वयाने काम केल्यामुळे हे उद्दिष्ट पाच महिने आधीच पूर्ण करणे शक्य झाले. त्यांनी देशातील सर्व शेतकऱ्यांचे अभिनंदन केले आणि फार्मर आयडी' ही शेतकऱ्यांची स्वतःची डिजिटल ओळख असल्याचे नमूद केले. आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शेती अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि समृद्ध करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे.

**कागदपत्रांचा व्याप कमी होणार आणि लाभांचे वितरण अधिक पारदर्शक होणार**

चौहान म्हणाले की फार्मर आयडी प्रणालीमुळे शेतकऱ्यांना सरकारी कार्यालयांत किंवा बँकांमध्ये वारंवार जाण्याची किंवा विविध योजनांसाठी पुन्हा पुन्हा तीच कागदपत्रे सादर करण्याची गरज मोठ्या प्रमाणात कमी होईल. यापूर्वी, विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना अनेकदा वारंवार कागदपत्रे द्यावी लागत असत, ज्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाया जात असे. आता फार्मर आयडीमुळे अनेक महत्त्वाच्या सेवा मिळवणे अधिक सोपे आणि पारदर्शक होईल.

बँक कर्ज आणि किसान क्रेडिट कार्ड : कर्ज मिळवण्याची प्रक्रिया अधिक सुलभ होईल, ज्यामुळे वारंवार कागदपत्रे पडताळण्याची गरज कमी होईल.

प्रधानमंत्री फसल विमा योजना: नैसर्गिक आपत्ती किंवा पिकांचे नुकसान झाल्यास, नुकसानभरपाईचे मूल्यांकन आणि वाटप अधिक पारदर्शक प्रक्रियेद्वारे केले जाईल आणि भरपाईची रक्कम थेट शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा केली जाईल.

आपत्ती निवारण मदत: आपत्तीच्या परिस्थितीत मदत थेट गरजू आणि पात्र शेतकऱ्यांपर्यंत अधिक जलद गतीने पोहोचेल.

किमान आधारभूत दराने पीक खरेदी: डिजिटल प्रणालीमुळे खरेदी प्रक्रियेतील मध्यस्थांची भूमिका संपुष्टात येईल आणि शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा पूर्ण मोबदला मिळणे सुनिश्चित होईल.

या उपक्रमाचा उद्देश कृषी सेवा वितरणात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व बळकट करणे हा आहे, जेणेकरून पात्र शेतकऱ्यांना किमान प्रशासकीय अडथळ्यांसह सरकारी मदतीचा लाभ घेता येईल. ६ कोटीपेक्षा जास्त शेतकऱ्यांना आधीच लाभ मिळाला आहे २ सप्टेंबर २०२४ रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर डिजिटल कृषी अभियान सुरू करण्यात आले. या अभियानांतर्गत विकसित केल्या जात असलेल्या डिजिटल पायाभूत सुविधांचा वास्तविक परिणाम दिसून आला आहे. शेतकरी ओळखपत्र आधारित सेवा यंत्रणेमुळे देशभरातील ६ कोटींपेक्षा जास्त शेतकऱ्यांना आतापर्यंत विविध योजनांचा थेट लाभ मिळाला आहे. कृषी सेवांशी शेतकऱ्यांची अधिकृत माहिती जोडली गेल्यामुळे फसवणूक टाळण्यात मदत होत आहे आणि पुन्हा सत्यता पडताळून पाहण्याची गरज राहिलेली नाही. विविध सरकारी विभागांमधील समन्वयदेखील यामुळे वाढला असून धोरण निर्मितीला व योजनांच्या देखरेखीला बळ मिळाले आहे. योजनांची अंमलबजावणी व लाभ वितरण यांचा मागोवा घेणे सोपे झाले आहे.

**सहकारी संघ पद्धतीचे सशक्त उदाहरण**

चौहान यांनी याचे श्रेय केंद्र आणि राज्य सरकारांच्या एकत्रित प्रयत्नांना दिले. सहकारी संघ पद्धतीचे हे उत्कृष्ट उदाहरण असल्याचे ते म्हणाले. निर्धारित वेळेआधीच उद्दीष्ट साध्य करण्यासाठी केंद्र सरकारचे अधिकारी, राज्य सरकारे, केंद्रशासित प्रदेशांचे प्रशासन, जिल्हास्तरीय पथके आणि प्रत्यक्ष गावांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींनी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांनी या सर्वांचे आभार मानले. खंडाने शेती करणारे शेतकरी आणि शेतात प्रत्यक्ष काम करणारे शेतकरी यांचा या डिजिटल मंचावर समावेश करण्यासाठी राज्ये व केंद्रशासित प्रदेशदेखील नियमांचे पालन करुन विशेष उपाययोजना करत आहेत. एकही पात्र शेतकरी सरकारच्या कल्याणकारी योजनांच्या लाभापासून व मदत योजनांपासून वंचित राहू नये याची दक्षता घेणे, हे याचे उद्दीष्ट आहे.

**कृषी क्षेत्रातील बदलांसाठी तंत्रज्ञान**

कमाल प्रशासन, किमान सरकारी दखल या तत्त्वानुसार शेतकऱ्यांच्या नांवनोंदणीमध्ये वाढ व्हावी, यासाठी कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय वचनबद्ध आहे. शेतकरी ओळखपत्र हे केवळ एक डिजिटल ओळखपत्र नसून पारदर्शी, जबाबदार व शेतकरी केंद्रीत शासन प्रणालीचा तो भक्कम पाया आहे. शेतकऱ्यांसाठी अधिकृत डिजिटल ओळख निर्माण करुन कृषी सेवांचा स्तर सुधारण्याचे व सरकारी योजनांचा लाभ योग्य लाभार्थ्यांपर्यंत परिणामकारकपणे पोहोचण्याची काळजी घेण्याचे या उपक्रमाचे ध्येय आहे. देशभरातील शेतकऱ्यांचे अभिनंदन करुन चौहान यांनी शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान वापरण्याचे, योजनांचा लाभ घेण्याचे व अनावश्यक गुंतागुंतीशिवाय त्यांच्यासाठीचे लाभ घेण्याचे आवाहन केले. भारतीय कृषी क्षेत्राला नवी उंची प्राप्त करुन देण्यामध्ये आपले योगदान देण्याचेही आवाहन त्यांनी शेतकऱ्यांना केले. ते म्हणाले की हे यश म्हणजे विकसित भारतासाठी सहायक ठरणारी व शेतकऱ्यांच्या हिताचे तंत्रज्ञान असलेली आधुनिक कृषी परिसंस्था उभारण्यामधील महत्त्वाचा टप्पा आहे.

# टोमॅटोचा कॅरेट ८० ते १०० रुपयांना; शेतकऱ्यांच्या हातात उरतात अवघे २५ ते ४५ रुपये!

## तोडणी आणि वाहतुकीवरच ५५ रुपये खर्च; उत्पादन खर्चाची भरपाई कशी करायची, शेतकऱ्यांचा सवाल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : नाशिक जिल्ह्यात टोमॅटोच्या बाजारभावात मोठी घसरण झाल्याने उत्पादक शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. २० किलोच्या कॅरेटला अवघे ८० ते १०० रुपये मिळत असल्याने टोमॅटोचा दर किलोमागे केवळ चार ते पाच रुपये होत आहे. त्यात तोडणीसाठी २० रुपये आणि वाहतुकीसाठी ३५ रुपये, असा कॅरेटमागे ५५ रुपये खर्च येत आहे. त्यामुळे विक्रीतून मिळणाऱ्या रकमेतून हा खर्च वजा केल्यानंतर शेतकऱ्यांच्या हातात अवघे २५ ते ४५ रुपये उरतात. म्हणजेच किलोमागे केवळ सव्वा रुपयांपासून सव्वादोन रुपयांपर्यंत रक्कम शिल्लक राहत आहे. यातून बियाणे, खते, औषधे, फवारणी, पाणी आणि मजुरीचा उत्पादन खर्च भागवायचा कसा, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे.

तोडणी-वाहतुकीतच निम्म्याहून अधिक रक्कम खर्च

टोमॅटोच्या बाजारभावाचे गणित पाहता शेतकऱ्यांची परिस्थिती स्पष्ट होते. २० किलोच्या कॅरेटला ८० रुपये भाव मिळाल्यास तोडणी आणि वाहतुकीचा खर्च वजा जाता केवळ २५ रुपये शिल्लक राहतात. तर १०० रुपये भाव मिळाल्यास ४५ रुपये हातात पडतात. हा हिशोब केवळ तोडणी आणि वाहतुकीपुरता मर्यादित आहे. प्रत्यक्षात टोमॅटोचे पीक उभे करण्यासाठी केलेला खर्च लक्षात घेतल्यास शेतकऱ्यांचे आर्थिक गणित आणखी बिघडते.

खते, बियाणे, कीटकनाशके, बुरशीनाशके, फवारणी, सिंचन आणि मजुरी यांसाठी मोठी गुंतवणूक करावी लागते. मात्र, बाजारात मिळणारा भाव या खर्चाच्या तुलनेत अत्यंत कमी असल्याने उत्पादन खर्चाची भरपाई होणेही कठीण झाले आहे.

माल शेतात ठेवायचा की कवडीमोल भावात विकायचा?

टोमॅटो हे नाशवंत पीक असल्याने काढणीला आलेला माल जास्त काळ शेतात ठेवणे शक्य होत नाही. वेळेत तोडणी न केल्यास माल खराब होण्याची भीती असते. त्यामुळे बाजारात भाव कमी असतानाही शेतकऱ्यांना टोमॅटो विक्रीसाठी पाठवावा लागतो. मात्र, विक्रीतून मिळणारी रक्कम तोडणी आणि वाहतुकीच्या खर्चातच संपत असल्याने शेतकऱ्यांसमोर मोठा पेच निर्माण झाला आहे.

काही शेतकऱ्यांना कमी भावामुळे टोमॅटोची तोडणी करणेही परवडत नसल्याची परिस्थिती आहे. हजारो रुपये खर्च करून पिकविलेला माल बाजारात नेण्यासाठीच पैसे खर्च करावे लागत असतील, तर शेतीतून उत्पन्न मिळवायचे कसे, असा सवाल उत्पादक शेतकरी उपस्थित करीत आहेत.

निर्यातीचा प्रश्न आणि दरातील घसरण

नवरात्रोत्सवाच्या काळात सीमा बंद असल्याने निर्यातीवर परिणाम झाला आणि त्यामुळे टोमॅटोचे भाव घसरले, असा शेतकऱ्यांचा समज होता. मात्र, नवरात्रोत्सव संपल्यानंतरही दरात सुधारणा झालेली नसल्याने शेतकऱ्यांची चिंता कायम आहे. बाजारात आवक, मागणी आणि निर्यातीची परिस्थिती यांचा दरांवर परिणाम होत असताना त्याचा थेट फटका उत्पादकांना बसत आहे.

शासनाने हस्तक्षेप करण्याची मागणी

वाढता उत्पादन खर्च, महागडी निविष्ठा, मजुरी आणि सिंचनाचा खर्च यामुळे आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना बाजारभावातील घसरणीचा मोठा फटका बसत आहे. अशा परिस्थितीत टोमॅटो उत्पादकांना दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी होत आहे.

टोमॅटोला रास्त भाव मिळावा, बाजारभाव कोसळल्यास शेतकऱ्यांच्या नुकसानीचा विचार करून मदत मिळावी, तसेच निर्यातीला चालना देऊन पर्यायी बाजारपेठा उपलब्ध करून द्याव्यात, अशी अपेक्षा उत्पादकांकडून व्यक्त होत आहे.

शेतकऱ्यांनी पिकविलेला माल विकून उत्पादन खर्च तर दूरच, साधा तोडणी आणि वाहतुकीचा खर्चही भागत नसेल, तर शेती करायची तरी कशी? टोमॅटो उत्पादकांसमोरील या प्रश्नावर शासन आणि संबंधित यंत्रणा कोणती ठोस पावले उचलतात, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## सैनिक टाकळी येथे मोफत हृदयरोग मार्गदर्शन शिबिर उत्साहात संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

संजय चव्हाण/सैनिक टाकळी : सैनिक टाकळी येथील देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार सांस्कृतिक सभागृहामध्ये आज ग्रामस्थांसाठी मोफत हृदयरोग मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. माधवबाग, ताराबाई पार्क, कोल्हापूर येथील सुप्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. विजय बांगर सर यांनी या कार्यक्रमात ग्रामस्थांना हृदयाची काळजी कशी घ्यावी, हृदयविकारापासून बचाव करण्यासाठी कोणती खबरदारी घ्यावी, याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

**हृदयाची काळजी, मधुमेह, रक्तदाब आणि संतुलित आहाराविषयी डॉ. विजय बांगर यांचे मार्गदर्शन**

या वेळी डॉ. बांगर यांनी हृदयाचे आरोग्य उत्तम राखण्यासाठी नियमित व्यायाम, संतुलित आहार, योग्य जीवनशैली आणि आरोग्याची वेळोवेळी तपासणी यांचे महत्त्व विशद केले. तसेच मधुमेह व उच्च रक्तदाब यांसारख्या आजारांवर नियंत्रण कसे ठेवावे, दैनंदिन आहार कसा असावा आणि आरोग्यदायी सवयी कशा अंगीकाराव्यात, याबाबत त्यांनी सोप्या व सर्वसामान्यांना समजतील अशा शब्दांत माहिती दिली.

कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या ग्रामस्थांनी आपल्या विविध आरोग्यविषयक समस्या व शंका डॉ. बांगर यांच्यासमोर मांडल्या. त्यांनी प्रत्येकाच्या प्रश्नांना समर्पक उत्तरे देत योग्य मार्गदर्शन केले आणि उपस्थितांच्या शंकांचे निरसन केले. त्यामुळे हा कार्यक्रम ग्रामस्थांसाठी आरोग्यविषयक ज्ञान मिळविण्याची आणि आपल्या आरोग्याबाबत जागरूक होण्याची महत्त्वपूर्ण संधी ठरला.

आरोग्य हीच खरी संपत्ती असून, हृदयविकारासारख्या गंभीर आजारांबाबत जनजागृती निर्माण करणे आणि नागरिकांना प्रतिबंधात्मक उपायांची माहिती देणे ही काळाची गरज आहे. या सामाजिक जाणिवेतून आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाला ग्रामस्थांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

विशेष म्हणजे, राष्ट्रगीताने या कार्यक्रमाची सांगता झाली. आरोग्य जनजागृतीचा संदेश देणारा हा उपक्रम सैनिक टाकळीच्या सामाजिक व सार्वजनिक जीवनातील एक प्रेरणादायी कार्यक्रम ठरला. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाषण वीं.एस. पी. पाटील सेवानिवृत्त अप्पर कोषागार अधिकारी यांनी केले. तसेच डॉक्टर अनिता संजय पाटील यांनी डॉक्टर बांगर सरांच्या हृदयरोगाविषयी कार्याची व त्यांना मिळालेल्या पुरस्काराची माहिती सर्वांना आपल्या भाषणांमध्ये व्यक्त केली. डॉक्टर काजल मारुती गायकवाड यांनी डॉक्टर विजय बांगर सरांचे आभार मानले व मार्गदर्शनाबद्दल कौतुक केले. डॉक्टर शिवाजी दौलतराव पाटील यांनी होमिओपॅथी उपचार बाबत उत्कृष्ट मार्गदर्शन अतिशय कमी वेळेमध्ये सर्वांना केले. डॉक्टर राहुल पाटील यांनी सदर कार्यक्रम असे उत्कृष्ट नियोजन झाल्याबद्दल कौतुक उद्गार काढले.तसेच सदर कार्यक्रम प्रसंगी सर्वांचे उत्तम आदरयुक्त भाषेमध्ये आभार प्रदर्शन कॅप्टन प्रकाश खोत यांनी केले.

ग्रामस्थांना विनामूल्य आरोग्यविषयक मार्गदर्शन उपलब्ध करून दिल्याबद्दल डॉ. विजय बांगर सर यांचे उपस्थितांनी आभार मानले.

## 'मन की बात'ला १२ वर्षे पूर्ण; पंतप्रधान मोदींचा आत्मनिर्भर भारत आणि 'व्होकल फॉर लोकल'चा संदेश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या लोकप्रिय 'मन की बात' या रेडिओ कार्यक्रमाला १२ वर्षे पूर्ण झाली आहेत. विजयादशमीच्या पवित्र मुहूर्तावर सुरू झालेल्या या प्रवासाला १२ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त, पंतप्रधान मोदींनी 'मन की बात'च्या १३९ व्या भागातून देशवासीयांशी संवाद साधला. हा प्रवास आणि देशातील लोकांच्या योगदानाला वंदन करणे हा माझ्यासाठी तीर्थयात्रेइतकाच पवित्र अनुभव असल्याचे त्यांनी सांगितले.

'व्होकल फॉर लोकल'मुळे साकार होणार आत्मनिर्भर भारताचे स्वप्न

येत्या सण-उत्सवांच्या काळात कुटुंबीयांसाठी खरेदी करताना स्थानिक कारागिरांनी तयार केलेल्या वस्तूंना प्राधान्य द्यावे, असे आवाहन पंतप्रधानांनी केले आहे. तुमच्या खरेदीमुळे स्थानिक कारागिरांचा उत्साह वाढेल आणि 'व्होकल फॉर लोकल' अभियानाला बळ मिळेल. हे अभियान जितक्या वेगाने पुढे जाईल, तितक्याच वेगाने आत्मनिर्भर भारताचे स्वप्नही साकार होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

लोकशक्तीची आराधना आणि आत्मीयतेची पुंजी

गेल्या १२ वर्षांत देशाच्या कानाकोपऱ्यातून असे अनेक सामान्य लोक समोर आले आहेत, जे राष्ट्रासाठी जगतात. या कार्यक्रमाच्या माध्यमातून मी देशातल्या लोकशक्तीची आराधना करतो, असे पंतप्रधान म्हणाले. मन की बात ऐकल्यानंतर जणू पंतप्रधान आमच्याच कुटुंबात बसून संवाद साधत आहेत, अशा आशयाचे शेकडो संदेश मला मिळाले आहेत. श्रोत्यांची ही आत्मीयता हीच माझ्यासाठी अमूल्य पुंजी आहे, अशी भावना



त्यांनी व्यक्त केली.

स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश

भारताची प्राचीन परंपरा असलेल्या निसर्ग आदर, परिसर स्वच्छता आणि जलस्रोतांची काळजी घेण्याच्या मुद्द्यावरही त्यांनी भर दिला. अवघ्या काही दिवसांवर आलेल्या दिवाळी आणि छठ या सणांच्या निमित्ताने ठिकठिकाणी स्वच्छता मोहीम राबवली जात असून, आपले छोटे प्रयत्नही मोठा बदल घडवू शकतात, असे पंतप्रधान म्हणाले.

महाराष्ट्रातील 'शबरी नेचुरल्स'च्या पॅकेजिंगला जपानचा 'गुड डिझाइन पुरस्कार'

महाराष्ट्रातील आदिवासी समुदायाने 'शबरी नेचुरल्स' या उपक्रमाद्वारे मध, मोहफुले, चारोळी आणि बांबूपासून तयार केलेली उत्पादने बाजारात आणली आहेत. या उत्पादनांच्या पॅकेजिंगवर आदिवासी कलेची सुंदर छाप असून, या पॅकेजिंगला जपानचा प्रतिष्ठित 'गुड डिझाइन पुरस्कार' मिळाला आहे, अशी माहिती पंतप्रधानांनी कौतुकाने दिली. तसेच, कर्नाटकातील 'बॅम्बू' नावाचे स्टार्टअप बांबू व शेतीच्या अवशेषांपासून पॅकेजिंग साहित्य तयार करत असल्याचे सांगत त्यांनी देशातील तरुणांच्या नवनवीन प्रयोगांचे कौतुक केले.

## कर्जतचा प्रकल्प हा पर्यावरणपूरकच, विरोधकांचे फेक नरेटिव्ह म्हणजे महाराष्ट्रविरोधी धोरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात प्रस्तावित असलेल्या टोरेंट पॉवर कंपनीच्या जलविद्युत ऊर्जा साठवण प्रकल्पावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याचा आरोप करत विरोधक आणि पर्यावरणप्रेमींनी सरकारवर निशाणा साधला होता. या वादावर आता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट प्रतिक्रिया देत विरोधकांचा आरोप खोडून काढला आहे.कर्जत पंप स्टोरेज प्रकल्प हा संपूर्णपणे पर्यावरणाला पूरक असाच प्रकल्प असून विरोधकांकडून केवळ फेक नरेटिव्ह (ऋञ्जश छ्रीीरींळींश) पसरवण्याचे काम सुरू आहे, असा जोरदार हल्लाबोल मुख्यमंत्र्यांनी केला आहे.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले की, खोटा नरेटिव्ह तयार करणे म्हणजे महाराष्ट्रविरोधी कृत्य आहे. या प्रकल्पामुळे कोणाचीही उपजीविका नष्ट होणार नाही आणि जर तशी परिस्थिती निर्माण झाली तर त्यांच्या पुनर्वसनाचा योग्य विचार केला जाईल. हा संपूर्ण प्रकल्प कायद्याच्या चौकटीत राहूनच पूर्ण केला जाईल, असे आश्वासनही त्यांनी दिले.

मुख्यमंत्र्यांचे विरोधकांना खडेबोल

मुख्यमंत्र्यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, समाजातील सर्व घटकांचा विचार करूनच या प्रकल्पाचे नियोजन करण्यात आले आहे. परंतु, केवळ राजकीय स्वार्थापोटी या विकासात्मक प्रकल्पाला विरोध केला जात असेल, तर ते अत्यंत अयोग्य आहे.

विरोधकांच्या आरोपांनंतर राज्य सरकारने या प्रकल्पाबाबतची वस्तुस्थिती समोर ठेवत खालील महत्त्वाची माहिती प्रसिद्ध केली आहे:

महाराष्ट्राचा प्रकल्प: हा गुजरातचा प्रकल्प नसून महाराष्ट्राचा आहे. यातील गुंतवणूक, रोजगार आणि निर्माण होणारी वीज सर्वकाही महाराष्ट्रालाच मिळणार आहे.

वीज अन् गुंतवणूक: या प्रकल्पातून तब्बल ३०,००० कोटी रुपयांची गुंतवणूक येणार असून महाराष्ट्राला १२,००० मेगावॅट स्वच्छ वीज उपलब्ध होणार आहे.

पर्यावरणपूरक तंत्रज्ञान: हा प्रकल्प कोळशावर आधारित नसून सौर ऊर्जेवर आधारित आहे. त्यामुळे पर्यावरणाचे नुकसान होणार नसून हा प्रकल्प पर्यावरणाला पूरक ठरणार आहे.

पर्यायी वृक्षारोपण: प्रकल्पासाठी २३३ हेक्टर जमीन लागणार असल्याने कंपनीने आधीच वन विभागाला २५३ हेक्टर जमीन सुपूर्द केली आहे. तसेच या क्षेत्रात टॉरेंट कंपनी ६०,००० आणि वन विभाग ३०,००० अशी एकूण ९०,००० नवी झाडे लावणार आहे.

अभयारण्यापासून दूर: हा प्रकल्प भीमाशंकर वन्यजीव अभयारण्यापासून १६ किमी आणि ज्योतिर्लिंग मंदिरापासून २० किमी दूर आहे. हा सर्व भाग इको-सेन्सिटिव्ह झोनच्या बाहेर आहे.

प्रदूषण अन् पाण्याची बचत: या प्रकल्पामुळे वर्षाला ४.६ दशलक्ष टन कोळशाचे ज्वलन आणि ४० लाख वाहनांच्या कार्बन उत्सर्जनाइतके प्रदूषण टळणार आहे. तसेच दरवर्षी १९.७ अब्ज लिटर कूलिंग वॉटरची बचत होणार आहे, जे ४ लाख लोकांसाठी पुरेसे असते.

**१५ ते २० दिवस प्रतीक्षा करूनही गॅस सिलिंडर मिळेना**

**ऑनलाइन पेमेंट करूनही ग्राहकांची गैरसोय! शहर विकास समितीचा आंदोलनाचा इशारा**

# जाधव गॅस एजन्सीविरोधात लासलगावमध्ये ढोल-ताशे बजाव आंदोलन!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी

लासलगावमध्ये घरगुती गॅस सिलिंडरच्या विलंबित वितरणाच्या प्रश्नावरून नागरिकांचा संताप उफाळून आला आहे. जाधव गॅस एजन्सीच्या कारभाराविरोधात लासलगाव शहर विकास समितीच्या वतीने ढोल-ताशे वाजवत आंदोलन करण्यात आले. ऑनलाइन बुकिंग करून आणि पैसे भरूनही अनेक दिवस सिलिंडर मिळत नसल्याचा आरोप ग्राहकांनी केला आहे.

ऐन सणासुदीच्या काळात घरगुती गॅस सिलिंडरसाठी ग्राहकांना प्रतीक्षा करावी लागत असल्याने गृहिणींचे स्वयंपाकाचे नियोजन कोलमडले आहे. काही ग्राहकांना १० ते १५ दिवस, तर काहींना १५ ते २० दिवस उलटूनही सिलिंडर मिळत नसल्याची तक्रार आहे. एजन्सीकडून समाधानकारक उत्तरे मिळत नसल्याने ग्राहकांना वारंवार पाठपुरावा करावा लागत असल्याचे आंदोलनकर्त्यांनी सांगितले.

ग्राहक संरक्षण मंत्र्यांनी लक्ष घालावे : प्रकाश पाटील

यावेळी पंचायत समितीचे माजी सदस्य प्रकाश पाटील यांनी ग्राहकांच्या समस्येकडे लक्ष वेधले. लासलगाव हे मंत्री छगनराव भुजबळ यांच्या मतदारसंघातील महत्त्वाचे गाव असून, ग्राहकांच्या या प्रश्नावर संबंधित मंत्र्यांनी तातडीने लक्ष घालून दिलासा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

ऑनलाइन पैसे भरूनही सिलिंडर मिळेना!

ग्राहक विकास खंडजोड यांनी आपली व्यथा मांडताना सांगितले की, गॅस सिलिंडरची नोंदणी करून ऑनलाइन पेमेंट केले, तरीही सिलिंडर मिळालेला नाही. एजन्सीकडून उडवाउडवीची उत्तरे मिळत असल्याने ग्राहकांनी दाद मागायची कुणाकडे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

२८ ऑक्टोबरपर्यंत सिलिंडर द्या, अन्यथा तीव्र आंदोलन!

लासलगाव शहरासह परिसरातील सर्व ग्राहकांना घरपोच गॅस सिलिंडर वितरण तातडीने सुरळीत करावे, अशी मागणी शहर विकास समितीने केली आहे. बुधवार, दि. २८ ऑक्टोबरपर्यंत ग्राहकांना सिलिंडर घरपोच मिळाले नाहीत, तर महिलांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

या आंदोलनात प्रकाश पाटील, राजेंद्र कराड, संदीप उगले, प्रमोद पाटील, धर्मेश जाधव, चंद्रकांत नेटारे, शेखर कुलकर्णी, विकास कोल्हे, बाळासाहेब जगताप, यश भोगे, भूषण वाळेकर, दत्ता कुमावत, दीपक परदेशी, राजू देसरडा, संतोष पवार, अनिल भागवत, महेश बकरे, गणेश जोशी, सचिन शिंदे, अभिजीत जाधव, अनिल भावसार, दीपक कांकरिया, दीपक जोशी, गणेश इंगळे, नामदेवराव शिंदे, विकास खंडजोड, मन्सूरभाई शेख, गोकुळ कहाने, दत्ता पाटील, अश्विन शिंदे, माधव मिस्तरी, रविराज बोराडे, सुरेश कुमावत, विजय बोथरा, विलास निकम, अंकुश पांडे, बबन काळे, रफिक शेख, नवनाथ घोटाळे यांच्यासह त्रस्त गॅस ग्राहक उपस्थित होते.

आता प्रशासन या प्रश्नाची दखल घेऊन ग्राहकांना दिलासा देणार का? जाधव गॅस एजन्सीचे वितरण सुरळीत होणार का? याकडे लासलगावकरांचे लक्ष लागले आहे.

